|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/कार्यशाळा-४१/ १७ /२०२३ दि.२७/०१/२०२३

**प्रति,**

१) मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,
विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा.संचालक / विभाग प्रमुख,
विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना -

**विषयः-विद्यापीठस्तरीय नियतकालिक अंक संपादक मंडळाच्या कार्यशाळेत सहभागाबाबत...**

**संदर्भः-** विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/१४/कार्यशाळा-४१/ १७ /२०२३,दि.२७/०१/२०२३

**महोदय / महोदया,**

आपणास विदीतच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्न क्षेत्रात पदवी-पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. या करीता संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा / विभाग येथे दरवर्षी वार्षिक नियतकालिक अंकाचे प्रकाशन होत असते. विद्यापीठ स्तरावर वार्षिक नियतकालिकांना परीक्षणाअंती पुरस्कार देण्यात येतात. प्रत्येक महाविद्यालयाने वार्षिक नियतकालिक तयार करतांना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, तसेच साहित्य निवड, मांडणी, योग्य शिर्षक व संपादन कौशल्य आदीबाबत सविस्तर माहिती प्राप्त व्हावी व त्यातून चांगले नियतकालिक अंक तयार व्हावे या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग व **म.गा.शि.प्र.मंडळाचे,कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,चोपडा.जि.जळगाव** यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय नियतकालिक अंक संपादक मंडळाची कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे.

आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठस्तरीय स्पर्धेचे आयोजन व नियोजन करणे सोईचे व्हावे यादृष्टीने आपल्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभागातील वार्षिक नियतकालिक अंक प्रकाशन समिती सदस्यांमधून दोन सदस्यांची नांवे मा. प्राचार्यांच्या सही शिक्यानिशी महाविद्यालयाच्या लेटरहेडवर **शुक्रवार ०३ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत मा. प्राचार्य, ,कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,चोपडा.जि.जळगाव** यांच्याकडे **email** - principalascchopda@gmail.com यावर पाठवावे व सहभागी होणाऱ्या सदस्यांना मार्गदर्शक सुचोप्रमाणे स्पर्धेस्थळी तयारी निशी पाठवावे. तसेच कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींसोबत महाविद्यालय नियतकालिक अंकाची एक प्रत द्यावी. कार्यशाळा स्थळ व संपर्क बाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे -

- **कार्यशाळा कालावधी - शनिवार, दि.०४ फेब्रुवारी, २०२३**
- **स्थळ - म.गा.शि.प्र.मंडळाचे,कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,चोपडा. जि.जळगाव**
- **संपर्कासाठी नांव व संपर्क क्रमांक -**

  १. मा.प्राचार्य, डॉ.ज्ञानेश्वर आ. सुर्यवंशी, संपर्क क्र. ०२५८६-२२० १४०,भ्रमणध्वनी-९४२२७९३२८०
  
  २. डॉ. शैलेश वाघ, विद्यार्थी विकास अधिकारी - ९८६०३७३४४६

सदर कार्यशाळेचे उद्घाटन **शनिवार, दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता** असल्याने प्रतिनीधीनी सकाळी ९.३० वाजेपूर्वी कार्यशाळा स्थळी उपस्थित राहावे. उपस्थितांकरीता अल्पोपहार, चहा व दुपारच्या भोजनाची व्यवस्था आयोजकांकडून निशुल्क करण्यात येईल. महाविद्यालयाने सहभागींचा प्रवासखर्च आपल्याकडे विद्यार्थ्यांकडून जमा होणाऱ्या नियतकालिक अंक शुल्क रकमेतून करावा, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**(प्रा.सुनिल बा.कुलकर्णी)**
संचालक, विद्यार्थी विकास

* **सोबत** :- प्रवेशिका

* **प्रत माहितीसाठी :-**

१. **म.गा.शि.प्र.मंडळाचे,कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,चोपडा.जि.जळगाव**
२. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
३. विभागप्रमुख, कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
४. विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
५. मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
६. मा.पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

**D.// Xpdata/mpp/Niyatkalik workshop२२-२३**

**On College Letter Head**

---

# प्रवेशिका

दि.    /    /2023

प्रति,
**मा. प्राचार्य,**
**म.गा.शि.प्र.मंडळाचे,**
**कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,**
**चोपडा. जि.जळगाव**

**विषयः-विद्यापीठस्तरीय ाियतकालिक अंक संपादक मंडळाच्या कार्यशाळेच्या सहभागाबाबत.....**
**संदर्भः-** विद्यापीठाचे पत्र क्र. जा.क्र. कबचौउमवि/१४/कार्यशाळा-४१/ १७ /२०२३,दि.२७/०१/२०२३

**महोदय,**

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रकान्वये विद्यापीठस्तरीय नियतकालिक अंक संपादक मंडळाची कार्यशाळा आपल्या महाविद्यालयात संपन्न होत आहे. सदर कार्यशाळेकरीता आमच्या महाविद्यालयातील नियतकालिक संपादक मंडळाचे खालील सदस्य सहभागी होत आहेत.

| अ.क्र. | नांव | पत्ता | भ्रमणध्वनि क्र. | ई-मेल | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

आपणांस विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रतिनिधी सोबत महाविद्यालय नियतकालिक अंक सा २०२१-२२ ची एक प्रत देत आहोत, तरी कृपया प्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.

**नियतकालिक संपादक**
भ्रमणध्वनि क्रमांक

**प्राचार्य/संचालक / विभागप्रमुख**
सही व शिक्का

D.// Xpdata/mpp/Niyatkalik workshop२२-२३